
# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

[redacted] Impact Factor - 7.139 [redacted]

12 April 2021 Special Issue- 40 Vol. I


# Thoughts of Dr. B.R. Ambedkar





Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Editor
Principal Dr. Kishan Pawar

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

**SPECIAL ISSUE – 40 Vol. I**

**Title of the issue : - Thoughts of Dr. B.R. Ambedkar**

© All rights reserved with the College & publisher Price : Rs. 600/-

**Editor – Arun Godam**
**Latur**

**Guest Editor**
**Principal Dr. Kishan Pawar**

**Published BY**
Shaurya Publication
Old MIDC , Near Kirti Gold Chowk, Latur
Email- hitechresearch11@gmail.com , 8149668999

**Printed By.**
**Shaurya Offset**
Old MIDC , Near Kirti Gold Chowk, Latur
Email- hitechresearch11@gmail.com

EDITION :
April 2021

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 40, Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
April 2021 | SJIF | Impact Factor : 7.139

# "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक चळवळ"

प्रा. डॉ. रंदिल गजेंद्र साहेबराव

शि.गु.रा.गे.शिंदे महाविदयांलय, परंडा. ता. परंडा, जि. उस्मानाबाद.

---

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आधुनिक भारताचा इतिहास घडवणाऱ्या विभूतीपैकी एक व्यक्ती होय. त्यांचे कार्य, कर्तृत्व आणि विचारांचा मागोवा घेतल्यानंतर त्यांच्यातील श्रेष्ठत्वाची प्रचीती येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, वैचारिक आणि तात्विक भूमिका व कार्य यांचे अवलोकन केल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक व्यक्ती नसून विचार संस्था होती हे कळते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चिंतनाच्या विषयावर नजर टाकली तर इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, लोकप्रशासन, राज्यघटना, पत्रकारिता, धर्मचिकित्सा, व्यवस्थापन शास्त्र आणि तत्त्वज्ञान अशा विविध विषयावर अधिकारहीन भाष्य करतात म्हणून त्यांना कोणत्याही एका विषयांमध्ये वंदिस्त करता येत नाही. भारतीय समाज व्यवस्थेतील हजारो वर्षापासून वहिष्कृत व उपेक्षित ठेवलेल्या कोट्यवधी सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक आणि शैक्षणिक आंदोलने उभारली आणि स्वतःची ओळख हरवून बसलेल्या अधिकार हिनव्यक्तीनात्यांचे "माणूसपण"मिळवून दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाज व्यवस्थेत व्यापक स्वरूपात मानवमुक्तीच्या लढ्यात प्रारंभ करून स्वार्थाने वहिष्कृत समाजामध्ये अस्मिता जागवली. भारतीय समाज व्यक्तीने अधिकार नाकारलेल्या दलित, शोषित, उपेक्षित आणि बहिष्कृत लोकांना त्यांचे न्याय, हक्क व अधिकार प्राप्त करून दिले. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे २० व्या शतकातील खरे महापुरुष ठरतात. बाबासाहेबांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता, आणि न्याय ह्या चिरंतन मूल्यांचा स्वीकार करून संपूर्ण भारतातील दलित, शोषित, उपेक्षित, स्त्रिया, गावगाड्याबाहेरील आणि गावकुसावाहेरील भटके व आदिवासी जाती जनजाती च्या प्रत्येक व्यक्तिंना त्यांचे मूलभूत हक्क व न्याय अधिकार भारतीय संविधानाच्या माध्यमातून मिळवून दिले.

म्हणून ज्येष्ठ समाजवादी विचारवंत मधु लिमये 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समाज क्रांतिकारक होते.' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय समाजात अमुलाग्र परीवर्तन पाहिजे होते. भारतीय समाजात सामाजिक गतिशीलतेचा पूर्ण अभाव होता. भारतीय समाजव्यवस्था वर्ण आणि जातिव्यवस्थेवर आधारित होती. विषमतेवर आधारित समाजव्यवस्थेला हिंदू धर्माची मान्यता होती. जातिव्यवस्थेचे मुळेच हिंदू धर्मात होती. प्रत्येक व्यक्तीला आपल्या जातीनुसार, जातीच्या नियमानुसार वर्तन करणे आवश्यक होते. कारण धर्माचा तसा आदेश होता. समाजावर धार्मिक रूढी परंपरा चा इतका प्रभाव होता की, प्रस्थापितांना यामध्ये वदल करणे मान्य नव्हते. याकरिता जातीप्रथा नष्ट करण्याचा उपाय डॉ. बाबासाहेब सुचवितात की, "प्रत्येक पुरुष आणि स्त्रीला शास्त्राच्या दास्यातून मुक्त करा."

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसाठी सामाजिक परिवर्तन हे स्वतःच एक ध्येय होते. सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी त्यांनी बुद्धांच्या तत्त्वप्रणाली चा स्वीकार केला होता.परिवर्तनाचे हे उद्दिष्ट्य साध्य होऊ शकत नाही. याची त्यांना स्पष्ट कल्पना होती कारण येथील समाज व्यवस्थेचा आधार धर्म आहे. म्हणून परिवर्तन आणण्यासाठी समाज व्यवस्थेचा आधार असलेला धर्म नाकारणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे समतामूलक समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी बौद्ध धम्माशिवाय दुसरा पर्याय नव्हता.म्हणून त्यांनी धम्मक्रांती करून भारतीय समाजात परिवर्तनाची प्रक्रिया सुरू केली.

बौद्ध धम्माच्यास्वीकारानंतर बौद्धांनी पारंपरिक मूल्य आणि प्रमाणके नाकारलीत आणि नवी सामाजिक मूल्य आणि प्रमाणके स्वीकारलीत. त्यामुळे त्यांना प्रस्थापित व्यवस्थेशी संघर्ष करावा लागला. मूल्य आणि प्रमाणके यांच्यातील परिवर्तन हे मूलभूत परिवर्तन आहे. कारण हे परिवर्तन इतर परिवर्तनाचा आधार आहे. बौद्धांनी नवीन सामाजिक मूल्य आणि प्रमाणेके स्वीकारल्यामुळे त्यांच्यात परिवर्तन घडून आले. हिंदू धर्मातील प्रचलीत प्रथा, लोक रूढी आणि परंपरा बौद्धांनी नाकारल्यात, त्याऐवजी बौद्ध धम्मानुसार नव्या प्रथा आणि परंपरा मानवतावादी आणि वैज्ञानिक आहेत. बौद्ध समाज आणि इतर अस्पृश्य यांचे तुलनात्मक अध्ययन केल्यास हे स्पष्ट होते की, अस्पृश्यांनी जुनी मुल्ये, प्रमाणके, प्रथा, आणि परंपरांनासोडल्यानाहीत. आजहीतेजुनीमुल्येप्रमाणके, प्रथा, अणि चिकटून आहेत. म्हणून त्यांच्यात स्वसन्मान, स्वप्रतिष्ठा आणि अस्मिता निर्माण होऊ शकली नाही. अजूनही ते लाचारीचे जीवन जगत आहे. परंतु बौद्धांमध्येमात्र स्वसन्मान, प्रतिष्ठा अस्मिता निर्माण झाली आहे. ते सन्मानाने एक , 'माणूस' म्हणून जगत आहेत.

डॉ.आंबेडकरांना आपल्या सामाजिक कार्याची सुरुवात करण्यास भाग पाडले ते भारतातील विषमतेने आणि विषमता सामाजिक स्तरापासून सुरू होऊन तिने वैयक्तिक स्तरावरील व्यक्तीचे जीवन ग्रासून टाकले होते. धर्मतरापूर्वीपासून बाबासाहेबांनी अत्यंत पोट तिडकीने हा ज्वलंत प्रश्न मांडला. महार वतन बील कायदेमंडळात मंजूर व्हावे म्हणून बाबासाहेबांनी लेखन, भाषणे व चर्चा याद्वारे प्रचंड प्रचार केला. बील १९/०३/१९२८ ला कायदेमंडळात चर्चेसाठी आले तेव्हा जिवाचा आटापिटा करून साहेबांनी बील पास व्हावे म्हणून प्रयत्न केले. त्यांनी बीलावर तारीख १९/०३/१९२८ ला कायदेमंडळात माहितीपूर्ण आणि कळकळीचे सविस्तर भाषण केले. वतनामुळे महार लोक पिढ्यान्‌ पिढ्या सरकारचे सरकारी अधिकाऱ्यांचे व गावच्या लोकांचे गुलाम म्हणून जगत आलेले आहेत. हे गुलामगिरी रात्रंदिवस करून महारानादरमहा काय वेतन मिळते याची माहिती साहेबांनी भाषणात सांगितली. बाबासाहेबांच्या भाषणाला उद्देशून तीन सभासदांनी भाषणे केली व अस्पृश्यांचे बुकर टी वॉशिंग्टन असा त्यांचा उल्लेख केला.

अस्पृश्य समाज, शूद्राशूद्रातिशूद्र समाज इथल्या वर्णवादी, जातीवादी मनुप्रणित मानसिकतेकडून किती अमानुषपणे छळला पिडला, नाडला गेला याचे ऑडिट पाहता सहज मिळते. महानुभाव, नाथ, लिंगायत, पंथ, कबीर तुकाराम सोडले तर धर्म प्रांतात आध्यात्मिक समता वगळता प्रचंड जातीय विषमता होती. कुळवाड्याचा राजा छत्रपती सोडले तर सातशे वर्षात दीनदलितांना कोणी वाली नव्हता. पेशवाईच्या आस्था नंतरच दलित शूद्रातिशूद्रांचीपहाट उगवली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतीय समाजक्रांतीच्या वाटचालीत मुख्य स्थान आहे. अस्पृश्यांच्या गुलामगिरीचा प्रश्न बाबासाहेबांनी सर्वांसमोर आणला आणि त्यांच्यासारखा नेतामिळाल्याने अंधारात चाचपडत असणाऱ्या अस्पृश्य समाजाला तेजस्वी मार्ग दिसू लागला. बाबासाहेबांच्या आधी परमहंस सभेचे दादोबा पांडुरंग, आर्य समाजाची स्थापना करणारे दयानंद सरस्वती, सत्यशोधक समाज स्थापित करणारे महात्मा फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे इत्यादींनी अस्पृश्य निवारणाचे कार्य हाती घेतले. याशिवायबडोद्याचे सयाजीराव गायकवाड आणि कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांनी अस्पृश्य समाजातील तरुणांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून आपली सामाजिक बांधिलकी जपली. बहुजन समाजाचा उध्दार होण्यासाठी शिक्षणाचा प्रसार हा तळागाळातील जनतेपर्यंत झाला पाहिजे म्हणून दोन्ही संस्थानातील सर्व धर्माच्या व विशेष करून अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत केली जाई.

आज ही जाती धर्माच्या नावावर होत असलेली मुस्कटदावी म्हणजे मनुष्य जातीला कलंक आहे. देशात जनता गुण्यागोविंदाने नांदत असताना धर्म आणि जातीचे विष निर्मळ आणिनिर्भेळ माणसात पेरले जाते. त्यामुळेच सकारात्मक परिवर्तनासाठी बाधा येते. प्रामुख्याने सवर्णांनी परिवर्तनाचा श्री गणेशा केला. आगामी काळात सामाजिक परिवर्तनाच्या लढाईत सर्वांनी उतरले पाहिजे व ती महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे. म्हणूनच की काय अशा प्रकारे चर्चासत्र घडवून आणण्या या मागचा उद्देश आहे असे मला वाटते.

Special Issue 40 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
April 2021 | SJIF | Impact Factor : 7.139

आजही आपण पाहतो आहे. रोज वर्तमानपत्रातून अनेक ठिकाणी दलितांवर अन्याय अत्याचार होत आहेत. सोनाई येथे नुकतेच झालेले तिहेरी हत्याकांड अमानुष आहे.हे असे कृत्य म्हणजे मानवतेला कलंकच आहे. या अगोदरच साताऱ्यातही जातीय द्वेषातून हत्याकांड झाले होते विशेष म्हणजे पुरोगामी महाराष्ट्रला हादविणा-या खैरलांजी हत्याकांडाची आठवण ताजी असतानाच हे सारे घडावे. या केवळ दिसणाऱ्या घटना आहेत. पण आजही महाराष्ट्रात अशा कितीतरी न दिसणाऱ्या घटना धडत आहेत. थोडक्यात काय तर जातीय द्वेषातून दलितांवर होणारे अन्यायअत्याचारसातत्याने वाढत आहेत. या क्रुरतेमागेजात वास्तव हेच कारण आहे. फुले, शाहू आणि आंबेडकरांचे नाव घेणाऱ्या महाराष्ट्रातच हे घडावे ही गोष्ट निश्चितच विचार करायला लावणारी आहे. महात्मा गांधीचे नाव घेणारा महाराष्ट्र अहिंसा कशी विसरेल? विवेकानंद आणि टिळकांचा आदर्श सांगणारा महाराष्ट्र एवढा अविचारी आणि अविवेकी कसा झाला?

महाराष्ट्राची ही अवस्था तर दुसऱ्या राज्याची आजची दुरावस्था किती भयानक आहे. बिहारसारख्या राज्यात अजून जात किती भयंकर गोष्ट आहे. आज स्वातंत्र्य मिळून 65 वर्षाचा काळ संपला पण मुसक नावाच्या जातीचे लोक अजूनही शिक्षण आणि सामाजिक कार्यापासून वंचित आहे. कारण हे लोक आधी मुसक म्हणजे उंदीर भाजून खातात त्यांना आजही रोटी, कपडा, मकान ह्या जीवन उपयोगी वस्तू मिळाल्याच नाहीत. आजही ते गावकुसावाहेर राहुनच जीवन जगतात ही विचार करण्यासारखी बाब आहे. सरकार नावाची चीज काय करते असा प्रश्न आपणास पडला पाहिजे.

स्वातंत्र्य, समता आणि बंधुता हा जीवन व्यवहार व्हावा यासाठी आपल्या लोकशाहीप्रधान देशाला अत्यंत सुंदर असा मूलमंत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय धटनेच्या रूपाने दिला; पण आपल्या लोकशाहीचे दुर्दैव म्हणजे असे की मंत्र, पोथ्या, आरत्या, आणि शनी महात्म्य, सत्यनारायण आपण घराघरात पोहोचविण्यास यशस्वी झालो. पण भारतीय राज्यघटना पोचविण्यास अयशस्वी ठरलो असल्या समाज व्यवस्थेत सर्व गोष्टी हरला पण जातहरली नाही.

संदर्भसूची:-

1) खैरमोडे, चांगदेव (१९५८) डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र (द्वितीय खंड) प्रकाशक: बौद्धजन पंचायत समिती, मुंबई पृष्ठ २४६,२४७

२) आगलावे, डॉ. प्रदीप-समाज शास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे.२००१.

३) खरात, डॉ. प्रकाश-आंबेडकरवाद: समाज आणि संस्कृती, आकांक्षा प्रकाशन, मुंबई. पृष्ठ ४७.

४) थोरात, डॉ. सुखदेव: दलित निरंतर विषमता आणि दारिद्र्य, सुगावा प्रकाशन, पुणे (०६ डिसेंबर २००७).

५) इंगळे, प्रा. रावसाहेब-आंबेडकरी साहित्यातील जीवन मूल्य -शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर-२०१० पृष्ठ १७

६) कसबे, प्रा. रावसाहेब-आंबेडकर वाद पृष्ठ ४१-४२

७) चिटणीस ग.भि-सामाजिक क्रांतीच्या दिशा, (प्राचार्य.म.भि. चिटणीस समग्र, वाङ्मय संपा. वामन निंबाळकर) प्रबोधन प्रकाशन, नागपूर २००७.

८) डहाट, धनराज, 'आंबेडकरवादी समाज क्रांती' प्रकाशन-राजप्रिय डहाट, शिवाजीनगर, नागपूर, प्र. आवडती २०० पृष्ठ क्रमांक २३.

९) खोब्रागडे, प्रा. दीपक कुमार-दीक्षाभूमी, गौरव ग्रंथ, खंड-२ प्रकाशक: सुजित माखाडे, बहुजन साहित्य प्रसार केंद्र, ४० महापुष्प सोसायटी, लोहार समाज सभागृह मागे, वेलत रोडी रोड, नागपूर-२७ प्रथम आवृत्ती: १४ ऑक्टोबर २०१३